जा.क्र.उमाशि-३/पुधि/११ वी कें.प्र./२०१५
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : २४/६/२०१५

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे शहर व पिंपरी-चिंचवड परिसर.

**विषय : इ. ११ वी केंद्रीय प्रवेश सन २०१५-१६ प्रवेशाबाबतची कार्यपध्दती.**

पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी चे प्रवेश केंद्रीय समितीकडून गतवर्षीपासून ऑनलाईन पध्दतीने निश्चित केले जात आहेत. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाच्या इ. ११ वी प्रवेशाच्या निवड याद्या आपल्या कॉलेजच्या **Login Id** व **Password** ने **http://pune.fyjc.org.in** या वेबसाईट वरुन डाऊनलोड करुन घ्याव्यात व नोटीस बोर्डावर लावाव्यात. त्याबाबत काही शंका असल्यास तात्काळ प्रवेश समिती कार्यालय **आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे** यांच्याशी संपर्क साधावा. प्रवेश समिती कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक **020-41038227** असा आहे.

इ. ११ वी च्या प्रवेशाबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील. सदर वेळापत्रकाप्रमाणे प्रवेशाबाबतची कार्यवाही करुन अहवाल प्रवेश समिती कार्यालयास व या कार्यालयास न चुकता सादर करावा याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपशिल |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | २४/६/२०१५ | सायं. ५.०० वाजता | पहिली गुणवत्ता यादी जाहीर करणे. |
| २ | २५/६/२०१५ ते २७/६/२०१५ | सकाळी १०.०० ते ४.०० | प्रथम गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ३ | २७/६/२०१५ | सायं ५.३० वाजेपर्यंत | उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील इनहाऊस कोटा, रिक्त जागा गुणवत्ता यादी-२ साठी ऑनलाईन पध्दतीने संगणकीय एजन्सीला कळविण.ज्या क.म.वि.नां अल्पसंख्यांक कोटा, व्यवस्थापन कोटयातील जागा केंद्रीय प्रवेश समितीला प्रत्यार्पित (Surrender) करावयाच्या असतील त्यांनी ऑनलाईन पध्दतीने जागा प्रत्यार्पित (Surrender) करु शकतील. |
| ४ | २/७/२०१५ | सकाळी ११.०० वाजता | दुसरी गुणवत्ता यादी जाहीर करणे. |
| ५ | २/७/२०१५ ते ४/७/२०१५ | सकाळी ११.०० ते ४.०० | दुस-या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ६ | ४/७/२०१५ | सायं ५.३० वाजेपर्यंत | उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील इनहाऊस कोटा रिक्त जागा गुणवत्ता यादी-३ साठी ऑनलाईन पध्दतीने संगणकीय एजन्सीला कळविणे. ज्या क.म.वि.नां अल्पसंख्यांक कोटा, व्यवस्थापन कोटयातील जागा केंद्रीय प्रवेश समितीला प्रत्यार्पित (Surrender) करावयाच्या असतील त्यांनी ऑनलाईन पध्दतीने जागा प्रत्यार्पित (Surrender) करु शकतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | ९/७/२०१५ | सकाळी ११.०० वाजता | तिसरी गुणवत्ता यादी जाहीर करणे. |
| ८ | ९/७/२०१५ व १०/७/२०१५ | सकाळी ११.०० ते ४.०० | तिस-या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ९ | ११/७/२०१५ ते १४/७/२०१५ | सकाळी १०.०० ते ४.०० | प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाची पूर्ण फी भरुन प्रवेश निश्चित करणे. |
| ९ | १५/७/२०१५ | **इयत्ता ११ वी साठीचे प्रत्यक्ष अध्यापनाचे काम सुरु करणे.** | |

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुलभरित्या पार पाडण्यासाठी खालीलप्रमाणे सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यांत येत आहे. त्याचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

१. केंद्रीय प्रवेश समितीकडून **http://pune.fyjc.org.in** या वेबसाईट वरुन डाऊनलोड करुन प्राप्त झालेली आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची संपूर्ण गुणवत्ता यादी दर्शनी भागात लावावी आणि दुसरी प्रत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात सर्वांच्या माहितीसाठी उपलब्ध ठेवावी.

२. ऑनलाईन प्रवेश निवड यादीमधील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी इ. १० वी च्या परीक्षेतील गुणांची टक्केवारी व निवड यादीमधील दाखविलेली टक्केवारी बरोबर असल्याची खात्री त्यांच्या मूळ गुणपत्रिकेवरुन करावी. (केवळ फक्त रु. ५०/- फी भरुन प्रवेश दयावा.)

३. मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जातीचे मूळ प्रमाणपत्र तपासून खात्री करुनच प्रवेश द्यावेत. विद्यार्थी जातीचे दाखले सादर शकत नसतील तर त्यांना लेखी हमीपत्र घेवून पुरेशी मुदत देण्याबाबत प्राचार्यांनी निर्णय घेऊन कार्यवाही करावी.

४. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाने Applicant's Original Category व Allotted Category पैकी Applicant's Original Category चा विचार करुन त्यानुसार आवश्यक कागदपत्रे पाहून प्रवेश दयावा. Allotted Category ची कागदपत्रे मागू नयेत. या सूचना वेळोवेळी सहविचार सभेत देण्यात आलेल्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यास प्रवेशापासून वंचित ठेवायचे नाही. काहीही प्रॉब्लेम असल्यास आपल्या झोन प्रमुखांशी संपर्क करुन आपल्याकडील प्रवेशाची कार्यवाही पूर्ण करावयाची आहे.

उदा :-

| Applicant's Category | Allotted Category | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| SC | ST | **SC** संवर्गाची कागदपत्रे तपासून प्रवेश दयावा **ST** संवर्गाची कागदपत्रे मागू नयेत. |
| Open | General Sports | **Open** संवर्गानुसार प्रवेश दयावा **Sports** ची प्रमाणपत्रे मागू नयेत. |
| Open | General Defence | **Open** संवर्गनुसार प्रवेश दयावा दयावा **Defence** ची प्रमाणपत्रे मागु नयेत. |

५. अ) खेळाडू, बदली, अपंग, आजी/माजी सैनिक, स्वातंत्र सैनिक इ. संवर्गातील प्रवेश देतांना आवश्यक ती मूळ प्रमाणपत्रे तपासून प्रवेश देण्यात यावा. याबाबत काही शंका निर्माण झाल्यास समिती कार्यालयाकडे संपर्क साधावा.

ब) परराज्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी राखीव संवर्गात प्रवेश देतेवेळी महाराष्ट्रातील सक्षम अधिकाऱ्याकडून त्यांच्या राखीव संवर्गाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊनच त्यांचा प्रवेश मान्य करावा. असे प्रमाणपत्र सादर करु शकत नसतील तर सदर प्रवेश नाकारण्यात यावा

६. वेळापत्रकानुसार प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना संगणकीय पावती Admit (स्लीप) देणे व प्रवेश नाकारणा-या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारल्याची पावती Reject (स्लीप) देणे याची जबाबदारी प्राचार्यांची राहील. विद्यार्थ्यांला प्रवेश नाकारल्यास त्याचे कारण **Online** नमूद करणे आवश्यक आहे.

७. **प्रवेश देणे व प्रवेश नाकारणे ही प्रक्रिया वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने करावी. ती प्रक्रिया न केल्यास सदरच्या जागा Not Admited समजून पुढच्या फेरीसाठी प्रवेशासाठी ग्राह्य धरल्या जातील याची नोंद घ्यावी.**

८. जितक्या विद्यार्थ्यांचे प्रवेश नाकारले त्याची यादी Email द्वारे कार्यालयास **(dydpune@gmail.com)** द्यावी. (प्रवेश फेरीनुसार)

९. ज्या विद्यार्थ्यांनी व्यवस्थापन कोटा, अल्पसंख्यांक कोटा किंवा इनहाऊस कोटात प्रवेश घेतलेला आहे त्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन मधील कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्यांनी मूळ घेतलेला प्रवेश रद्द केल्या नंतरच ऑनलाईन प्रवेशासाठी त्याला ग्राह्य समजण्यात येईल.

१०. कनिष्ठ महाविद्यालयाच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या ५ टक्केपेक्षा जादा प्रवेश व्यवस्थापन कोट्यातील होणार नाहीत याची दक्षता प्राचार्यांनी घ्यावयाची आहे. प्रवेशाच्या मर्यादेपेक्षा जास्त प्रवेश झाल्यास संबंधित प्राचार्यांस जबाबदार धरण्यात येवून योग्य प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

११. प्रथम व द्वितीय निवड यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर जर त्यांना अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील बेटरमेंटनुसार (उन्नत प्रवेशाची संधी ) प्रवेश घ्यावयाचा असेल तर पहिल्या कनिष्ठ महाविद्यालयातील त्याचा प्रवेश ऑनलाईन रद्द करुन तशी प्रिंट देण्यात यावी व त्यांचा मूळ शाळा सोडल्याचा दाखला परत करावा व सदर विद्यार्थ्यांकडून **"अन्य कनिष्ठ महाविद्यालयात प्रतिक्षा यादीनुसार मला प्रवेश मिळाला असल्याने माझा आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात घेतलेला प्रवेश रद्द करावा व मूळ शाळा सोडल्याचा दाखला परत करण्यात यावा. तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील मला मिळालेला प्रवेश मी माझ्या स्वेच्छेने रद्द करीत असून यापुढे प्रवेशासाठी पुन्हा येणार नाही व त्याबाबत तक्रार करण्याचा मला अधिकार राहणार नाही."** असे लेखी हमीपत्र लिहून घ्यावे व त्याची मूळ प्रमाणपत्रे परत करावीत, त्याबाबत त्यांना कसलीही तक्रार करण्यास वाव मिळणार नाही, व अशा प्रकारच्या तक्रारी या कार्यालयाकडे येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

१२. केंद्रीय प्रवेश समितीकडून ऑनलाईन **http://pune.fyjc.org.in** वेबसाईटद्वारा प्राप्त झालेल्या निवड (प्रथम,द्वितीय व तृतीय) यादीतील काही विद्यार्थी जून २०१४ किंवा त्यापूर्वी इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेले असतील व त्यांच्याकडे शाळा सोडण्याचा मूळ दाखला असेल (म्हणजेच अशा विद्यार्थ्यांनी इ. १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर कोणत्याही शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसेल) अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास हरकत नाही. तथापि त्यांचेकडे शाळा सोडल्याचा मूळ दाखला नसेल व त्यांचा समावेश चुकून निवड अथवा प्रतिक्षा यादीत करण्यांत आलेला असल्यास त्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत समितीशी संपर्क करावा.

१३. वरील प्रवेश प्रक्रियेनुसार निवड यादीतील कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रवेश क्षमते इतक्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले नाही तर रिक्त राहीलेल्या जागा ऑनलाईन लगेचच दिलेल्या वेळापत्रकानुसार सरेंडर करण्यात याव्यात. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत आपल्या स्तरावरुन परस्पर जागा भरण्यात येवू नयेत. (अपवाद **व्यवस्थापन कोटा व अल्पसंख्यांक कोटा**)

१४. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या शालान्त प्रमाणपत्राव्यतिरिक्त अन्य बोर्डाची अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा महाराष्ट्र राज्याबाहेरील राज्यातील किंवा परदेशातील विद्यार्थ्यांसाठी **योग्यता प्रमाणपत्र** पुणे विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून मिळाल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश कायम होणार नाही., याची संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी स्पष्ट कल्पना द्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

१५. योग्यता प्रमाणपत्राच्या अभावी विद्यार्थ्यांचा तात्पुरत्या स्वरुपातील प्रवेश रद्द होणे किंवा विद्यार्थी वार्षिक परीक्षेस अपात्र ठरविला जाण्याची कार्यवाही होऊ शकते सबब संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यापासून १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह पुणे विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करावा व योग्यता प्रमाणपत्र मिळवावे ही जबाबदारी विद्यार्थी व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची राहील.

१६. महाराष्ट्र राज्याबाहेरील इतर राज्यातील किंवा परदेशातील विद्यार्थ्यांची गुणपत्रके तपासून टक्केवारीची खात्री करुन, वैधता तपासून आवश्यक ते प्रमाणपत्रे व गुणपत्रके तपासून (कट ऑफ पॉईंट) नुसार प्रवेश निश्चित होत असल्यास देण्यात यावा. अन्यथा सबळ कारण देवून प्रवेश नाकारता येईल.

**१७. दिनांक १५/७/२०१५ पासून इयत्ता ११ वी चे वर्ग नियमितपणे सुरु करावेत.**

१८. पटपडताळणी व कार्यभार निश्चितीसाठी केंद्रीय प्रवेश समिती मार्फत प्रत्यक्ष प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या तसेच व्यवस्थापन कोटा ५ % माध्यमिक शाळा संलग्न उच्च माध्यमिकसाठी २०% व अल्पसंख्यांक संस्था ५० % कोटा कमाल प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत राहून मान्य केला जाईल. सदर आरक्षणाशिवाय जादा दिलेले प्रवेश रद्द करण्यात येतील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील

**१९. इ. ११ वी प्रवेशाबाबतची कार्यवाही प्राचार्यांनी वरील सूचनाप्रमाणे करणे आवश्यक असतांनाही एखाद्या विशिष्ट विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश समितीकडून अथवा शिक्षण उपसंचालक**

यांचे कार्यालयाकडून पत्राची अथवा चिठ्ठीची मागणी केली जाते असे पालकांकडून समजते. परंतु केंद्रीय प्रवेश समितीकडून कोणतेही पत्र अथवा चिठ्ठी देण्याची तरतूद प्रवेश पध्दतीमध्ये करण्यात आलेली नाही. तेव्हा अशा प्रकारची मागणी करु नये.

२०. प्रवेश देतांना संस्थेने/कनिष्ठ महाविद्यालयाने कोणत्याही प्रकारे विद्यार्थी /पालक व संबंधित व्यक्तींकडून कसल्याही प्रकारची देणगी व कॅपिटेशन फी घेणे सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध)अधिनियम १९८७ नुसार दंडनीय गुन्हा आहे. याची दक्षता घ्यावी. अशा प्रकारची देणगी व कॅपिटेशन फी घेणे हा दंडनीय गुन्हा आहे. याची नोंद घ्यावी.

२१. माहितीच्या अधिकार विषयीचा कायदा २००५ मध्ये आस्तित्वात आलेला आहे. एखाद्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये झालेल्या एकूण प्रवेशाबाबतची माहिती जाणून घेण्याचा अधिकार विद्यार्थी / पालक / स्वयंसेवी संस्था अथवा समाजातील अन्य घटकांना निश्चितच आहे. त्यामुळे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये झालेल्या प्रवेशाबाबतची माहितीची मागणी केली जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यासाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी च्या वर्गात दिलेल्या प्रवेशाबाबत प्रवर्गनिहाय माहिती अधिकारी म्हणून प्राचार्य / मुख्याध्यापक यांनी, संबंधितांनी मागणी केल्यास द्यावयाचे आहे. प्रवेशाचे कामकाज चालू असतानाच सदर प्रवर्गनिहाय अद्ययावत याद्या बिनचूक तयार ठेवाव्यात मागणी केल्याबरोबर विनाविलंब संबंधिताना माहिती उपलब्ध करुन द्यावी. याबाबत कोणतेही माहिती न दिलेबाबतचे अपील केंद्रिय प्रवेश समितीकडे येणार नाही याची दक्षता घ्यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन इ. ११ वी प्रवेशाबाबत कार्यवाही करावी.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहे.

**(रामचंद्र जाधव)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे-१**
**तथा अध्यक्ष**
**इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती,**
**पुणे – १.**